# के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अहिल्यानगर येथे अभ्यास दौरा

**नाशिक ।** येथील सूर्योदय फाउंडेशन आणि के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या संयुक्त विद्यमाने आदर्श गाव हिवरे बाजार (ता. जि.अहिल्यानगर) आणि माऊली सेवा प्रतिष्ठान, शिंगवे नाईक (ता. जि.अहिल्यानगर) येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यावेळी पद्मश्री पुरस्कार प्राप्त व ग्रामविकासाचे प्रेरणास्थान आदरणीय पोपटराव पवार यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा.स्वानंद डोंगरे, सूर्योदय फाउंडेशनचे अध्यक्ष श्री.योगेश टिळे, सचिव श्री.ज्ञानेश्वर भोर, प्रा. रोहित भास्कर व विद्यार्थी उपस्थित होते. श्री. पवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शाश्वत ग्रामविकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करत जलसंधारण, मृदासंधारण, वृक्षारोपण, गावाचे जल अंदाजपत्रक तयार करणे अशा उपक्रमांमधून गावाचा सर्वांगीण विकास कसा साधता येतो, याचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी हिवरे बाजार गावात राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे पाण्याची पातळी वाढविण्यात यश मिळाले असून, आजही तो विकास टिकवून ठेवण्यात आला आहे. या कार्यामुळे हिवरे बाजारने अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन गावाचे नाव उंचावले आहे. श्री. पवार यांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी अनुभव कथनाद्वारे ग्रामविकासाची दिशा दाखवली. अभ्यास दौऱ्यात सहभागी विद्यार्थ्यांनी गावातील विविध प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देत त्यांचा अभ्यास केला. यानंतर विद्यार्थ्यांनी हिवरे बाजार येथे यशदा, पुणेच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्राला भेट दिली व तेथे सुरु असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली. तसेच, डॉ. राजेंद्र धामणे यांच्या माऊली सेवा प्रतिष्ठान अंतर्गत मनगाव प्रकल्पास भेट देत, त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती घेण्यात आली. या अभ्यास दौऱ्यात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अभ्यास दौऱ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव होऊन, ग्रामविकासासाठी योगदान देण्याची प्रेरणा लाभली.